क्रिकेटपर्वणी आजपासून!

'आयपीएल'च्या १८व्या हंगामात गतविजेत्या कोलकाताची बंगळूरुशी सलामी

वृत्तसंस्था, कोलकाता

'क्रिकेटोत्सव' अशी ख्याती असलेल्या इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) या विश्वातील सर्वांत लोकप्रिय ट्वेन्टी-२० स्पर्धेच्या १८व्या हंगामाला आज, शनिवारपासून सुरुवात होणार आहे. कोलकाता येथे रंगारंग उद्घाटन सोहळ्यासह या स्पर्धेचे बिगूल वाजणार असून त्यानंतर सलामीच्या लढतीत गतविजेत्या कोलकाता नाइट रायडर्स संघासमोर रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुचे आव्हान असेल. या सामन्यावर पावसाचे सावट आहे.

दरवर्षीप्रमाणेच यंदाही कोणते संघ जेतेपदासाठी प्रमुख दावेदार असणार, मुंबई इंडियन्स किंवा चेन्नई सुपर किंग्ज हे संघ वर्चस्व गाजवणार का, महेंद्रसिंह धोनीची ही अखेरची स्पर्धा ठरणार का, कोणते नवे तारे उदयाला येणार असे विविध प्रश्न चाहत्यांना पडू लागले आहेत. या चर्चांमुळे 'आयपीएल'बाबतची उत्सुकता अधिक वाढते. त्याच प्रमाणे काही नवे नियम आणि नवे कर्णधार याकडे चाहत्यांचे विशेष लक्ष असेल.

कोरोनामुळे चेंडूला लकाकी आणण्यासाठी लाळेचा वापर करण्यास बंदी घालण्यात आली होती. मात्र, 'आयपीएल'च्या हंगामापूर्वी मुंबई येथे झालेल्या

कर्णधारपदासाठी भारतीयांना पसंती

यंदाच्या हंगामासाठी ९० पैकी नऊ संघांनी भारतीय कर्णधारांना पसंती दिली आहे. पॅट कमिन्सच्या (सनरायजर्स हैदराबाद) रूपात एकमेव परदेशी कर्णधार आहे. अक्षर पटेल (दिल्ली कॅपिटल्स) आणि रजत पाटीदार (रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु) हे 'आयपीएल'मध्ये प्रथमच नेतृत्वाची धुरा सांभाळणार आहेत. तसेच राजस्थानचा नियमित कर्णधार संजू सॅमसन पहिल्या तीन सामन्यांत केवळ फलंदाज म्हणून खेळणार असल्याने युवा रियान पराग नेतृत्व करेल.

पावसाचा 'ऑरेंज अलर्ट' शनिवारी कोलकाता येथे पावसाचा 'ऑरेंज अलर्ट' देण्यात आला आहे. विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला असून यामुळे इडन गार्डन्सवर उपस्थित राहणाऱ्या चाहत्यांचा हिरमोड होऊ शकेल.

कर्णधारांच्या बैठकीत ही बंदी उठविण्याचा निर्णय झाला. तसेच रात्रीच्या सामन्यांत दव असल्यास दुसऱ्या डावातील ११ व्या षटकानंतर चेंडू बदलण्याचीही मुभा देण्यात आली. त्यामुळे आता गोलंदाजांना अधिक मदत मिळणार असून त्यामुळे सामने चुरशीचे होणे अपेक्षित आहे. गतहंगामात संघ सातत्याने २२०-२३० धावांपर्यंत मजल मारत होते. मात्र, आता बॅट आणि चेंडू यात अधिक समतोल साधला जाऊ शकेल.

सलामीलाच कस

कोलकाताच्या ऐतिहासिक इडन गार्डन्स मैदानावर आज होणाऱ्या सलामीच्या लढतीत गतविजेत्या कोलकाताची बंगळूरुशी गाठ पडेल. एकीकडे कोलकाताचे यंदा जेतेपद राखण्याचे, तर दुसरीकडे बंगळूरु संघाचे पहिल्या जेतेपदाची प्रतीक्षा संपविण्याचे लक्ष्य असेल. गतहंगामात श्रेयस अय्यरने कोलकाताला कर्रंडक मिळवून दिला. मात्र, त्यानंतर कोलकाताने त्याला संघमुक्त केले आणि लिलावात अनुभवी अजिंक्य रहाणेला खरेदी करत त्याच्याकडे नेतृत्वाची धुरा सोपवली. बंगळूरुच्या संघानेही नेतृत्वात बदल करताना रजत पाटीदारकडे जबाबदारी सोपविली. आता या दोघांचाही सलामीला कस लागेल. चॅम्पियन्स करंडकात चमकदार कामगिरी करणारा फिरकीपटू वरुण चक्रवर्ती आणि तारांकित फलंदाज विराट कोहली यांच्यातील द्वंद्वाकडेही चाहत्यांची नजर असेल.

शहर, ग्रामीण संघांची आगेकूच

ठाणे : पुणे शहर आणि पुणे ग्रामीण या संघांनी राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेत अनुक्रमे पुरुष आणि महिला विभागातून बाद फेरी निश्चित केली. त्याच प्रमाणे मुंबईचा शहर पूर्व, शहर पश्चिम आणि उपनगर पश्चिम संघांनी महिला विभागातून बाद फेरीत स्थान मिळवले.

ठाणे येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत महिला विभागात पुणे ग्रामीण संघाने सिंधुदुर्गवर ५४-१४ असा मोठा विजय मिळवला. पुणे ग्रामीण संघासाठी मंदिरा देवकर, सलोनी गजमल, रेखा सार्वत यांचा खेळ निर्णायक ठरला. मुंबई शहर पश्चिम संघाने ठाणे शहर संघाचा ४०-२२ असा पराभव केला. श्रद्धा कदमने एका चढाईत चार गडी टिपून अष्टपैलू वेगळा ठसा उमटवला. मुंबई शहर पूर्व संघाने पालघर संघाचा प्रतिकार ५४-४० असा मोडून काढला. मुंबई उपनगर पश्चिम संघाने सांगलीचा ३६-२१ असा पराभव केला.

पुरुष विभागात रायगडने यजमान ठाणे शहराला ३३-२९ असे चार गुणांनी पराभूत केले. पार्थ ठाकूर, मिथुन मोकल यांच्या चढाया निर्णायक ठरल्या. नाशिकने बीडचा ४७-२९, ठाणे ग्रामीणने नंदिडचा ५५-२६ असा पराभव केला. पुणे शहरने सिंधुदुर्गला ३४-१९ असे नमवले. आदित्य शेळके, दीपक सांगळे, संदेश देवकुळे यांचा खेळ उल्लेखनीय झाला.

ज्योष्ठांच्या कॅरम स्पर्धेत गायकवाड यांचा विजय

पुणे : ज्येष्ठांच्या जी. पी. सहस्रबुद्धे कॅरम स्पर्धेत वाडोसहेब गायकवाड आणि चंद्रशेखर सकलम यांनी संघर्षपूर्ण विजयाची नोंद केली. गायकवाड यांनी सुनील शेजलकर यांचा १८-१५, १०-२५, २३-२२ असा पराभव केला. सकलम यांनी गिरीश जोशी यांचे कडवे आव्हान १४-११, ११-२२, १३-१२ असे परतवून लावले.

करोनापश्चात ७५ हजारांहून अधिक छोटे उद्योग-धंदे संपुष्टात

संकट कोसळलेले सर्वाधिक व्यवसाय महाराष्ट्रात

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई: करोनाकाळ आणि त्यासाठी योजलेल्या टाळेबंदीने केलेला कहर कायम असून, त्यापश्चात पाच वर्षांत व्यवसाय गुंडाळाव्या लागलेल्या सूक्ष्म, लघु व मध्यम (एमएसएमई) उद्योगांची एकूण संख्येने ७५,००० चा टप्पा ओलांडल्याचे सरकारच्याच अधिकृत आकडेवारीने स्पष्ट केले आहे. ही नोंदणीकृत उद्योगांची संख्या असून, नोंदणी नसलेल्या एकूण छोट्या व्यवसायांकरिता संकटाचे प्रमाण यापेक्षा कितीतरी अधिक आहे.

छोट्या उद्योगधंद्यांची नोंदणी असलेल्या सरकारचे 'उद्यम' पोर्टलवर उपलब्ध तपशिलानुसार, जुलै २०२० मधील पोर्टलच्या सुरुवातीपासून चालू आर्थिक वर्षात २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत, तब्बल ७५,०८२ नोंदणीकृत एमएसएमई उद्योगांनी या ना त्या आर्थिक संकटांमुळे जीव सोडल्याचे स्पष्ट होत आहे. याच पोर्टलवर उपलब्ध तपशिलानुसार, चालू आर्थिक वर्षात बंद पडलेल्या (२८ फेब्रुवारीपर्यंत) एमएसएमई उद्योगांची संख्या ३५,५६७ वर पोहोचली आहे, जी आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये बंद पडलेल्या

राज्यवार संकट स्थिती कशी?

चालू आर्थिक वर्षात देशभरातून सर्वाधिक महाराष्ट्रात ८,४७२ नोंदणीकृत एमएसएमई उद्योग-व्यवसाय बंद झाले. त्यानंतर तामिळनाडूमध्ये ४,४९२ उद्योग, गुजरातमध्ये ३,९४८, राजस्थानमध्ये २,९८९ आणि कर्नाटकमध्ये २,०७० उद्योग बंद झाले.

१९,८२८ एमएसएमईच्या तुलनेत जवळपास दुप्पट आहे.

आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये १३,२९०; आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये ६,२२२; आणि ऐन करोना छायेतील आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये १७५ एमएसएमईचा उद्यम प्रवास संपुष्टात आला आहे. एमएसएमई मंत्रालयातील राज्यमंत्री शोभा करंदलाजे यांनी राज्यसभेत एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात ही माहिती दिली. त्यांच्या मते, उद्यम पोर्टलवर नोंदणीकृत ६.१ कोटी एमएसएमईपैकी बंद उद्योगधंद्यांची एकूण संख्या ०.१२ टक्के इतकी आहे.

'उद्यम पोर्टल १ जुलै २०२० रोजी एमएसएमईच्या वर्गीकरणासाठी सुधारित निकषांसह सुरू करण्यात आले.

२८ फेब्रुवारी रोजी, उद्यम नोंदणी पोर्टल आणि उद्यम असिस्ट मंचांवर संपूर्ण भारतात नोंदणीकृत एमएसएमईची एकूण संख्या ६.०५ कोटी होती तर त्याच कालावधीत बंद पडल्यामुळे नोंदणी रद्द झालेल्या छोट्या उद्योग-व्यवसायांची एकूण संख्या ७५,०८२ होती,' असे करंदलाजे उत्तरादाखल म्हणाल्या.

दरम्यान, नवीन म्युच्युअल क्रेडिट गॅरंटी योजनेअंतर्गत २०२५-२६ मध्ये एमएसएमईसाठी एक ते दीड लाख कोटी रुपयांचे पतहमीचे कवच सरकारकडून खुले केले जात आहे, असे त्या म्हणाल्या. ही योजना पात्र एमएसएमईंना उपकरणे किंवा यंत्रसामग्री खरेदीसाठी मंजूर १०० कोटी रुपयांपर्यंतच्या कर्जासाठी सदस्य कर्जदाता संस्थांना राष्ट्रीय क्रेडिट गॅरंटी ट्रस्टी कंपनी लिमिटेड (एनसीजीटीसी) कडून ६० टक्क्यांपर्यंत पतहमी प्रदान करते.

'सेन्सेक्स'ची ७७ हजारांकडे आगेकूच

मुंबई : परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांकडून सुरू झालेला निधीचा ओघ आणि बँक समभागांमधील खरेदीचा सपाटा यामुळे प्रमुख निर्देशांक सेन्सेक्स आणि निफ्टी शुक्रवारच्या सत्रात सुमारे १ टक्क्यांनी वधारले. सलग पाचव्या तेजीच्या सत्रामुळे सेन्सेक्सने ७७,००० पातळीकडे मार्गक्रमण केले आहे.

सप्ताहअखेर सेन्सेक्स ५५७.४५ अंशांनी वधारून ७६,९०५.५१ पातळीवर स्थिरावला. दिवसभरात त्याने ६९३.८८ अंशांची झेप घेत ७७,०४१.९४ या सत्रातील उच्चांकी पातळीला स्पर्श केला. दुसरीकडे निफ्टीमध्ये १५९.७५ अंशांची वाढ झाली आणि तो २३,३५०.४० पातळीवर स्थिरावला.

जोखीममुक्त घडामोडींमध्ये अपेक्षित घट आणि डॉलर निर्देशांकातील घसरण यामुळे उदयोन्मुख देशांकडे पुन्हा परकीय निधीचा प्रवाह परतू लागला आहे. फेडरल रिझर्व्हच्या नकारात्मक संकेतांमुळे देशांतर्गत भांडवली बाजारात परदेशी गुंतवणूकदार निव्वळ खरेदीदार बनले आहेत. अमेरिकी मध्यवर्ती बँक - फेडरल रिझर्व्ह चालू वर्षात दोनदा व्याजदर कपातीची शक्यता वर्तवली आहे.

● वेळ : सायं. ७.३० वा. ● थेट प्रक्षेपण : स्टार स्पोर्ट्स १, स्टार स्पोर्ट्स १ हिंदी, जिओहॉटस्टार ॲप.

दिल्लीला हरवून महाराष्ट्राचा संघ उपांत्य फेरीत

गुवाहाटी : महाराष्ट्राच्या मुलींच्या संघाने शुक्रवारी दिल्लीचा सात गडी राखून पराभव करत २३ वर्षांखालील मुलींच्या एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत उपांत्य फेरी गाठली.

दिल्लीने प्रथम फलंदाजी करताना ५० षटकांत ९ बाद २३६ धावा केल्या. तनिशा सिंग (५८) आणि श्वेता सेहरावत (५९) या दोघींचे योगदान महत्त्वाचे होते. महाराष्ट्राच्या खुशी मुल्लाने चार गडी बाद केले.

आव्हानाचा पाठलाग करताना महाराष्ट्राने ४४.२ षटकांत ३ बाद २३८ धावा केल्या. ईश्वरी सावकार (७९) आणि भाविका अहिरे (नाबाद ६२) या जोडीने तिसऱ्या गड्यासाठी १३७ धावांची भागीदारी करताना महाराष्ट्राचा विजय निश्चित केला.

PUBLIC NOTICE

NOTICE is hereby given to the public that, the flat more particularly described in the schedule hereunder written is in name of **Mr. Kapil Ahuja and Ms. Shweta Nair**, as the owned thereof and have agreed to sell the said flat to my client. All PERSONS having any claim in respect thereof by way of sale, exchange, gift, mortgage, charge, trust, inheritance, possession, lease, lien or otherwise howsoever are requested to inform the same in writing to the undersigned ADVOCATE **within 7 (seven) days** from the date hereof, failing which, claim or claims if any, of such person or persons will be considered to have been waived and/or abandoned and the transfer shall be completed.

SCHEDULE ABOVE REFERRED TO

All that piece and parcel **Residential Flat No. 702**, an area admeasuring about **57.61 sq.mtrs.** i.e. **620.11 sq.ft.**, together with attached terrace **49.08 sq.ft.** i.e. **4.56 sq.mtrs.**, together with Balcony **37.57 sq.ft.** i.e. **3.49 sq.mtrs.**, situated on the **7th Floor, Building No. 3, Vinayak – 6, Wing No. E**, together with covered Car Parking No. **06**, of the **project Ashtavinayak City Phase - 2**, in the **society known as Ashtavinayak City Phase - 2 Vinayak Building No. 6 Cooperative Housing Society Limited**, situated at **Survey No. 162 (Old S. No. 137), Hissa No. 1A (Old Hissa No. 1+2A+2B+2C)** situated at **Village Phursungi**, Pune, within the limits of Pune Municipal Corporation, within registration jurisdiction of Sub-Registrar, Taluka Haveli, District Pune.

Pune, Dt.21/03/2025

Deepali S. Sarulkar (Advocate)
B-18, Parmar Trade Centre, Sadhu Vaswani Chowk, Camp, Pune 411001.
Ph.: 9960966044/9423579929.

PUNE CANTONMENT BOARD

PUBLIC NOTICE

General Public is hereby informed that the property known as House No. 6 A Sholapur Bazar, GLR Sy. No. 3904/363 admeasuring 1452.00 sq. ft. Pune Cantonment is held on Old Grant Terms. The recorded HoRs are 1. Angella Vincent Mendonza 2. Marsha Joseph. Mr. Asif Hamid Sayyed submitted application dtd 09.11.2023 requesting for transfer of property on the basis of following documents:
(a) Sale Deed dt. 05.08.2023 Regd at HVL-23/1917/2023
(b) Admission Deed dt. 13.08.2024 Regd at HVL-11 Sr. No. 6155/2024
(c) copy of Affidavit dt. 3.03.2024 executed by Ms Jazeba Kausar Anees Chishti & Mr. Asif Hamid Sayyed.
(d) Deed of Correction regd at HVL-23/3829/2025 dt. 12.02.25
After mutation, name of the HoR. to be recorded in the General Land Register is asunder:
(i) Ms Jazeeba Kausar Anees Chishti
(ii) Mr. Asif Hamid Sayyed
Any person having any objection for aforesaid mutation, he/she may file his/her objection in writing to the Lands Section of Pune Cantonment Board within 30 days of publication of this notice.
Office of Pune Cantonment Board reserves right to revoke the mutation, if it is noticed in future that, the applicant has suppressed / misrepresented the facts.
Signed at Pune on this 20th day of March 2025.
Pune, Dated: 20th March 2025.

Chief Executive Officer
Pune Cantonment Board
(Subrat Pal)

जा. क्र.१३९७/२०२५
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
पुणे विभाग, पुणे बाजीप्रभु कॉलेज समोर
४५-२, के. बाळकृष्ण पाटील मार्ग, पुणे - १
दि. १८/०३/२०२५

जाहीर निविदा

मा. धर्मादाय सह आयुक्त, पुणे विभाग पुणे.
अर्ज क्रमांक ८६/२०२५
कलम 36(1)(a)
डॉ. जाल मेहता फॉउंडेशन
रजि. नं. ई - ५ (पुणे)

मा. धर्मादाय सह. आयुक्त, पुणे, यांच्या अर्ज क्र. ८६/२०२५, कलम 36(1)(a) मधील दिनांक १९/०३/२०२५ च्या आदेशाप्रमणे **'डॉ. जाल मेहता फॉउंडेशन,** रजि. नं. ई – ५ (पुणे) या न्यासाची खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत **'जशी आहे त्या स्थितीत'** विकी करण्याचे आहे. सही, इच्छुक लोकांनी आपल्या निविदा पाठवाव्यात.

निविदेच्या अटी

१. निविदा बंद पाकिटामध्ये मा. धर्मादाय सह आयुक्त, पुणे यांच्या खाली दिलेल्या पत्त्यावर निविदा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत पाठवाव्यात. ३० दिवसानंतर प्राप्त झालेल्या निविदा किंवा हरकतीचा विचार केला जाणार नाही.

२. निविदेबरोबर पुणे देण्यात किंवा विशेष करण्यात इच्छुक कुणाही व्यक्तीने आपल्या मालकाची आपले नाव व पत्ताहरु स्वतःची किंवा आपल्या वकिलाची स्वाक्षरी असलेला न्यास वाचकाकरिचाच वकिलाकडे अगर रीतीने पाठविणाऱ्या करावे जेणेकरून ती याचिकाकर्त्याच्या वकिलाकडे याचिका /अर्ज / संदर्भाच्या सुनावणीसाठी निश्चित करण्यात आलेल्या दिनांकाच्या वेळ दिवस अगोदर पोचावी. याचिका / अर्ज / संदर्भास विरोध करावयाचा असल्यास सदर सुनावेस विरोधाची कारणे किंवा त्यांच्या समर्थनाची पत्र जोडावी. कुणाही व्यक्तीस सदर याचिका / अर्ज/ संदर्भाची पत्र हवी असल्यास त्यासाठी विहित शुल्कसह परुस्पास निम्नस्वाक्षरीकरांद्वारे ती उपलब्ध करून देण्यात येईल.

४. सर नमूद बाबी पाहता, कृपया लक्षात घ्यावे की वरील प्रकरण माननीय शहीद मोहम्मद पैगंबर विश्वी न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ, पीठासीन, न्यायालय ६, त्यात न्यायिक सदस्य श्री विनोद शर्मा आणि तांत्रिक सदस्य श्री समीर कक्कर यांचा समावेश असलेल्या न्यायालय ६, वर पीठासीन शहीद मोहम्मद पैगंबर विश्वी न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांच्या समोरील अर्ज क्रमांक ६ ऑफ २०२५ रोजी स. १०.३० वाजता किंवा त्यानंतर कोणी काझतास सुनावणीसाठी सादर करण्यात येईल, आणि तेथे याचिकाकर्त्ते, म्हणजे बायोटेक प्रायव्हेट लिमिटेड यांचेविरुद्ध कॉर्पोरेट नादारी निराकरण प्रक्रियेसाठी याचिका दाखल करून घेण्याची विनंती करतील.
आज दि. २२ मार्च, २०२५ रोजी

दर्शित दवे
केविन ट्र. ५, पहिला मजला, टीकोज शॉपिंग सेंटर च्या वर, रेसी गली पीसन, अकबरअलीज च्या शेजारी, ४३, वॉर नरीमन रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१
मोबाईल क्र.: +९११९६२६२४७
ईमेल: office@darshitdave.com
MAH/1681/2014

जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि, खाली परिशिष्ट नमूद केलेली मिळकत ही श्री. विनोदकुमार जगनाथ गुप्ता व श्री. कुणाल विनोदकुमार गुप्ता यांच्या भाडेपट्टा हक्काची व तांबडेहिवाटीची असून त्यांनी सदर मिळकत ही श्री. राजकुमार मसप्पा चव्हाण व इतर हा यांना हस्तांतरण करण्याचे मान्य व कबूल केले असून सदर मिळकती संदर्भातील दिनांक २७/०६/१९९० रोजीचे श्री. पोकरदास कोटुमल तर्फे कोर्ट कमिश्नर श्री. बी. जी. महालस्कर यांनी श्री. जगन्नाथ एन. गुप्ता यांना लिहून दिलेले खरेदीखत हे संपूर्ण मूळ दस्त व दिनांक १७/०५/१९९१ रोजीचे हवेली क्र. १ मध्ये नोंदविलेला भाडेपट्टा दस्त क्र. ७१९०/१९९१ या दस्ताची मुळ पावती व सूची क्र. २ हे गहाळ झाले आहे. तरी सदर वर नमूद केलेला कागदपत्रांसंदर्भात कुणाही माहिती असल्यास किंवा कोणाकडे सदर कागदपत्र असल्यास त्यांनी हे खालील पत्त्यावर आणून द्यावी. तसेच खालील परिशिष्ट नमूद केलेल्या मिळकतीसंदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, लीन, व्यवस्थापत्र, असाइनमेंट, पोटगी, हक्क, अथवा तत्सम स्वरूपाचे हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत आपले लेखी मांडावे तसेच कागदपत्रे आमचे खालील पत्त्यावर आणून समक्ष दाखवून आमची खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदरील मिळकत निर्वध निजोखमी व बोजारहित आहे व कोणाचाही कोणत्याही प्रकारचे हक्क अधिकार असलीत ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून श्री. राजकुमार मसप्पा चव्हाण व इतर हे आमचे अशिल बँकेकडून कर्ज घेऊन हस्तांतरचा व्यवहार पूर्ण करीत आहेत. मागावून कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

मिळकतीचे वर्णन : मौजे–उंढरी, तालुका–हवेली जिल्हा पुणे येथील सर्व्हे नं. १३६ यासी सिटी सर्व्हे नं. ९३३९/१ या मिळकतीवरील सिंध को–ऑप हौसिंग सोसायटी ल्ड मधील प्लॉट न– ७०८ (जुना प्लॉट न– ११३) यासी क्षेत्र ८७७.९३ चौ.मी. (मालमत्ता प्रकारानुसार २१९.४८ चौ.मी.) व त्यावरील बंगलो बांधकाम यासी क्षेत्र ६३०० चौ.फुट. म्हणजेच ६६२.६७५ चौ.मी. बिल्ट–अप ही मिळकत.

दिनांक : २२/०३/२०२५ पुणे

सौ. मोनमा ना. कुलकर्णी, श्री. नारायण कुलकर्णी, Advocates (बेंबळेकर लॉ फर्म)
युनिट क्र. ५०५, कॉन्व्हेल्थ, फायनल प्लॉट नं–१००, सिटीएस नं. १७०३ बी, शिवाजीनगर, पुणे. मोबाईल न – ९७६३३९९३०९, ०२०६९०९२३९०.

नमुना क्र. एनसीएलटी. ३ ए
राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण मुंबई यांचे समक्ष
कंपनी याचिका क्र. १८,२०२५

स्मॉल इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया (सिडबी),
नोंदणीकृत कार्यालय, सिडबी टॉवर, १५ अशोक मार्ग, लखनौ, २२६००१, उत्तर प्रदेश आणि शाखा कार्यालय, स्वावलंबन भवन, प्लॉट क्र. सी-११, जी व्हॅनिक बॉक्स कॉम्प्लेक्स, नॉर्थ (पूर्व), मुंबई ४०००५९, महाराष्ट्र मेल : sarb_mumbai@sidbi.in ..... वित्तीय पेढ्यांची धिरदु

डॉ. सिध्दम बायोटेक प्रायव्हेट लिमिटेड, नोंदणीकृत कार्यालय क्र. ५०८-५१२, सेक्टर कर्ल, पाचवा मजला, मॅक्रोनोल्ड्स च्या वर, विठ्ठल रुक्मिणी मंदिर मार्ग, चनवडी, पुणे, महाराष्ट्र, भारत ४११०४० आणि कार्यालय, स.क्र. ५२३, मलबार हिलसमोर, सिध हिंद सोसायटी, लुब्ध नगर, पुणे ४११०४८ ..... कॉर्पोरेट कर्जदार

याचिकेची सूचना

स्मॉल इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया च्या वतीने ॲडव्होकेट दर्शित दवे यांनी दि. १८ मार्च, २०२५ रोजी डॉ. सिध्दम बायोटेक प्रायव्हेट लिमिटेड यांची कॉर्पोरेट नादारी निराकरण प्रक्रिया सुरु करण्यासाठी नादारी व दिवाळखोरी संहिता, २०१६ मधील अनुच्छेद ७ अंतर्गत एक याचिका सादर करण्यात आलेली होती, ज्यात, माननीय न्यायाधिकरणाने डॉ. सिध्दम बायोटेक प्रायव्हेट लिमिटेड यांना वर्तमानपत्रात सूचना प्रकाशित करण्याहे दि. ७ एप्रिल २०२५ रोजी न्यायिक सदस्य श्री निलेश शर्मा आणि तांत्रिक सदस्य श्री समीर कक्कर यांच्या समावेश असलेल्या न्यायालय ६ वर पीठासीन राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांचे समक्ष कंपनी याचिका सुनावणीसाठी निश्चित करण्यात आलेली आहे.

सदर याचिकेस पुणे देण्यात किंवा विशेष करण्यात इच्छुक कुणाही व्यक्तीने आपल्या मालकाची आपले नाव व पत्ताहरु स्वतःची किंवा आपल्या वकिलाची स्वाक्षरी असलेला न्यास याचिकाकर्त्याच्या वकिलाकडे अगर रीतीने पाठविणाऱ्या करावे जेणेकरून ती याचिकाकर्त्याच्या वकिलाकडे याचिका /अर्ज / संदर्भाच्या सुनावणीसाठी निश्चित करण्यात आलेल्या दिनांकाच्या वेळ दिवस अगोदर पोचावी. याचिका / अर्ज / संदर्भास विरोध करावयाचा असल्यास सदर सुनावेस विरोधाची कारणे किंवा त्यांच्या समर्थनाची पत्र जोडावी. कुणाही व्यक्तीस सदर याचिका / अर्ज/ संदर्भाची पत्र हवी असल्यास त्यासाठी विहित शुल्कसह परुस्पास निम्नस्वाक्षरीकरांद्वारे ती उपलब्ध करून देण्यात येईल.

सर नमूद बाबी पाहता, कृपया लक्षात घ्यावे की वरील प्रकरण माननीय शहीद मोहम्मद पैगंबर विश्वी न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ, पीठासीन, न्यायालय ६, त्यात न्यायिक सदस्य श्री निलेश शर्मा आणि तांत्रिक सदस्य श्री समीर कक्कर यांचा समावेश असेल, यांचे समक्ष दि. ७ एप्रिल, २०२५ रोजी स. १०.३० वाजता किंवा त्यानंतर कोणी काझतास सुनावणीसाठी सादर करण्यात येईल, आणि तेथे याचिकाकर्त्ते, म्हणजे बायोटेक प्रायव्हेट लिमिटेड यांचेविरुद्ध कॉर्पोरेट नादारी निराकरण प्रक्रियेसाठी याचिका दाखल करून घेण्याची विनंती करतील.
आज दि. २२ मार्च, २०२५ रोजी

दर्शित दवे
केविन ट्र. ५, पहिला मजला, टीकोज शॉपिंग सेंटर च्या वर, रेसी गली पीसन, अकबरअलीज च्या शेजारी, ४३, वॉर नरीमन रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१
मोबाईल क्र.: +९११९६२६२४७
ईमेल: office@darshitdave.com
MAH/1681/2014

PUBLIC NOTICE

It is hereby given to the public that, the flat more particularly described in the schedule hereunder written is in name of **Mr. Kapil Ahuja and Ms. Shweta Nair**, as the owned thereof and have agreed to sell the said flat to my client. All PERSONS having any claim in respect thereof by way of sale, exchange, gift, mortgage, charge, trust, inheritance, possession, lease, lien or otherwise howsoever are requested to inform the same in writing to the undersigned ADVOCATE **within 7 (seven) days** from the date hereof, failing which, claim or claims if any, of such person or persons will be considered to have been waived and/or abandoned and the transfer shall be completed.

SCHEDULE ABOVE REFERRED TO

All that piece and parcel **Residential Flat No. 702**, an area admeasuring about **57.61 sq.mtrs.** i.e. **620.11 sq.ft.**, together with attached terrace **49.08 sq.ft.** i.e. **4.56 sq.mtrs.**, together with Balcony **37.57 sq.ft.** i.e. **3.49 sq.mtrs.**, situated on the **7th Floor, Building No. 3, Vinayak – 6, Wing No. E**, together with covered Car Parking No. **06**, of the **project Ashtavinayak City Phase - 2**, in the **society known as Ashtavinayak City Phase - 2 Vinayak Building No. 6 Cooperative Housing Society Limited**, situated at **Survey No. 162 (Old S. No. 137), Hissa No. 1A (Old Hissa No. 1+2A+2B+2C)** situated at **Village Phursungi**, Pune, within the limits of Pune Municipal Corporation, within registration jurisdiction of Sub-Registrar, Taluka Haveli, District Pune.

Pune, Dt.21/03/2025

Deepali S. Sarulkar (Advocate)
B-18, Parmar Trade Centre, Sadhu Vaswani Chowk, Camp, Pune 411001.
Ph.: 9960966044/9423579929.

एआरटी हाऊसिंग फायनान्स (इंडिया) लिमिटेड
(पूर्वीची एआरटी अफोर्डेबल हाऊसिंग फायनान्स (इंडिया) लिमिटेड)
नोंद. कार्यालय: 107, पहिला मजला, सेक्टर स्काय टॉवर, जनाती सुभाष पलस, गितमपुरा, नवी दिल्ली - 110034
शाखा कार्यालय : 49, उद्योग विहार फेज -४, गुरूग्राम, हरयाणा 122015.

परिशिष्ट-IV [नियम ८(१) पाहा] ताबा सूचना (अचल मालमत्तेसाठी)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकर हे **एआरटी हाऊसिंग फायनान्स (इंडिया) लिमिटेड (CIN No. U65999DL2013PLC255432)** चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शीअल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरीटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत आणि सिक्युरीटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, 2002 नमील नियम 3 सह वाचण्यात येणाऱ्या अनुच्छेद 13(12) अंतर्गत कर्जदार **LXPP/N005517-117000117०** यांनी दि. 09.10.2024 रोजी एक मागणी सूचना पत्रावली त्यात कर्जदार **शंतीय सुखराम वैद्य आणि सुषमा संतीय वैद्य,** यांना सुचनेत नमूद कलमात आलेल्या **दि. 07.10.2024** रोजी पुढील रक्कम रु. 7,75,063/- (रुपये सात लाख पंच्याहत्तर हजार त्रेसष्ट फक्त) आणि तीवरील व्याजाची सदर सूचना प्राप्त होण्याच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत परफेडीस करण्याचे आव्हान करण्यात आले होते.

कर्जदार यांनी सदर रकमेची पतफेड न केल्याने वाढ़ी कर्जदार आणि त्यां लोकांना सूचित करण्यात येते की निम्नस्वाक्षरीकरांनी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, 2002 मधील नियम 8 सह वाचण्याता येणाऱ्या सदर अधिनियमातील अनुच्छेद 13 मधील उप-नियमा (4) अंतर्गत प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत **दि. 20.03.2025** रोजी खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे.

कर्जदार आणि सर्व लोकांना याद्वारे सावधगिरीची सूचना देण्यात येते की त्यांनी सदर मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि असा कोणताही व्यवहार केल्यास ते एआरटी हाऊसिंग फायनान्स (इंडिया) लिमिटेड यांच्या **दि. 07.10.2024** रोजी पुढील रक्कम रु. 7,75,063/- (रुपये सात लाख पंच्याहत्तर हजार त्रेसष्ट फक्त) आणि तीवरील व्याजाच्या चाफीस असेल.

सदर अनामत मत्ता सोडवून घेण्याबाबती उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कर्जदारांचे लक्ष सदर अधिनियमातील अनुच्छेद 13 मधील उप-विभाग (8) कडे वेधण्यात येते.

अचल मालमत्तेचे वर्णन

मालमत्ता संबंधित फ्लॅट / युनिट क्र. 404, दोघा मजला, इमारत क्र. डी.2, कॉम्प्लेक्स "एक्वॉरियम एक्वेंज" म्हणून ओळखले जाते, गट क्र. 240, गाव जांभूळ, तालुका मावळ, जिल्हा- पुणे, महाराष्ट्र येथे स्थित आणि चतुर्सीमा खालीलप्रमाणे :
पूर्वे : लेआऊट योजनेनुसार — **पश्चिम :** लेआऊट योजनेनुसार
उत्तर : लेआऊट योजनेनुसार — **दक्षिण :** लेआऊट योजनेनुसार

दिनांक : 20.03.2025 स्थान : पुणे (महाराष्ट्र) — प्राधिकृत अधिकारी, एआरटी हा